**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**जनसंपर्क विभाग**

---

**रोजगाराभिमुख कौशल्य निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण महत्वाचे - कुलसचिव डॉ. तुषार देशमुख**

**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने**

**'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' वर राष्ट्रीय परिसंवाद संपन्न**

अमरावती :

विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्य निर्माण व्हावे, याकरिता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० महत्वाचे असून या धोरणाचे महत्व प्रत्येक शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे, असे प्रतिपादन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी केले. विद्यापीठाच्या आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्यावतीने 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' या विषयावर राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन डॉ.के.जी. देशमुख सभागृहामध्ये करण्यात आले, त्याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.जी.एल. गुल्हाने, विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील, प्रा. आनंद मांजरखेडे, प्रा.पी.ए. वऱ्हाडपांडे उपस्थित होते.

कुलसचिव डॉ. तुषार देशमुख म्हणाले, हे धोरण राबवित असतांना शिक्षकांनी वर्तमान स्थिती समजून घेवून विद्यार्थ्यांमधील कौशल्य कसे विकसित होतील, याचा सातत्याने विचार करणे गरजेचे आहे. राष्ट्र बांधणीमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग उपयुक्त असून त्यानुषंगाने राष्ट्रीय धोरण महत्वाचे आहे.

परिसंवादाच्या पहिल्या सत्रात विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ.जी.एल. गुल्हाने यांनी सांगितले, शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षणाचा नवीन आकृतीबंध आणि व्यावसायिक कौशल्ये पायाभूत शिक्षणाच्यादृष्टीने महत्वाची आहेत. द्वितीय सत्रात एन.जी.ओ. आणि स्थानिक संस्था यांनी मागास घटकांच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासाकरिता निस्वार्थपणे काम करण्याची गरज असून त्या माध्यमातून राष्ट्र विकासाकरिता योगदान द्यावे, असे मत प्रा. आनंद मांजरखेडे यांनी, तर तृतीय सत्रात प्रा.पी.ए. वऱ्हाडपांडे यांनी सांगितले, शैक्षणिक धोरण वर्तमान परिस्थितीत भविष्यातील एक मोठी संधी आहे. मनुष्यबळ संसाधनाचा विकास यातून होणार असून कौशल्याधिष्ठीत समाज होण्यामध्ये हातभार लागेल, असे विचार व्यक्त केले. याप्रसंगी प्रास्ताविकतेतून संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी राष्ट्रीय परिसंवाद आयोजनामागील भूमिका विशद केली.

समारोप कार्यक्रम आंतर विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वैशाली गुडधे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर संचालक डॉ. श्रीकांत पाटील, अभ्यासक्रम समन्वयक डॉ. प्रशांत भगत तसेच प्रा. आनंद मांजरखेडे, प्रा.पी.ए. वऱ्हाडपांडे उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गुडधे म्हणाल्या, परिसंवादाचे यशस्वी आयोजन झाले असून विविध महाविद्यालयांचे प्राध्यापक आणि शिक्षण क्षेत्रातील मान्यवरांना याचा निश्चितच फायदा होणार आहे. शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत या धोरणातील बारकावे पाहोचवावे आणि याची अंमलबजावणी होण्याकरिता पुढाकार घ्यावा, असे सांगितले.

पाहुण्यांचा परिचय प्रा. सुरेश पवार, प्रा. वैभव जिसकार व डॉ. प्रशांत भगत यांनी करुन दिला. संचालन डॉ. रोहिणी देशमुख यांनी, तर आभार प्रा. प्रिती माटे यांनी मानले. परिसंवादाला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांतील प्राध्यापक तसेच आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील विविध अभ्यासक्रमांचे समन्वयक, प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २१/०२/२०२२.

दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2022 42